## समुपदेशन समितीचा अहवाल

बुधवार, 14 सप्टेंबर 2016 वेळ – 2 तास

महाविद्यालयाकडून सुचवण्यात आलेल्या विद्यार्थिनी सोबत समुपदेशनाचे सत्र घेण्यात आले. विध्यार्थिनी कडून समस्या समजून घेत असताना असे लक्षात आले कि,

- विद्यार्थिनीच्या सासरच्या कुटुंबातील सदस्यांना मुलीचे शिक्षण घेणे मान्य नाही.
- घरातील कामाकडे दुर्लक्ष होत आहे असा समज आहे.
- शिक्षण घेवून नोकरी करण्यास परवानगी नसणार आहे तर शिक्षण कशासाठी घ्यावे असे कुटुंबाचे मत आहे.
- परंतु विद्यार्थिनीला शिक्षण पूर्ण करायचे आहे.

वरील समस्या लक्षात घेवून पुढील प्रमाणे मार्गदर्शन केले.

- विद्यार्थिनीला हे पटवून दिले कि, कुटुंबातील सदस्याचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन चुकीचा आहे. त्यामुळे त्यंचा विरोध आहे. आपल्या समाज व्यवस्थेमध्ये मुलींच्या शिक्षणाला दुय्यम स्थान दिले जाते.
- शिक्षण चालू ठेवत असताना घरातील कामाकडे दुर्लक्ष होत नाही याची जाणीव सातत्याने कुटुंबाला करून द्यावी लागेल.
- कुटुंबांमध्ये शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तीना किवा महाविद्यालयातील प्राध्यापकांना विरोध करत असणाऱ्या व्यक्तीना भेटायला लावून समजावून सांगू शकतो.
- कुटुंबातून होत असलेल्या विरोधामुळे नैराश्य येवू न देता, त्यांचा विरोध होणार आहे हे गृहीत धरून पुढील वाटचाल करावी.

वरील चर्चे नंतर विध्यार्थिनीचा तणाव काही प्रमाणात कमी झाल्याचे जाणवत होते. या पुढे काही अडचण आल्यास प्राध्यापकांशी चर्चा करण्याचे सुचवले.

शिल्पा शिवणकर

समुपदेशक

भरत कांबळे

समुपदेशक

## समुपदेशन समितीचा अहवाल

शुक्रवार १८ ऑगस्ट २०१७, वेळ – ३ तास

विवाहित मुलींच्या गटासोबत समुपदेशनाचे सत्र घेण्यात आले. महाविद्यालयात शिकत असताना त्यांना कुटुंबाकडून सहकार्य मिळत नाही. आणि याचा परिणाम त्यांच्या शैक्षणिक प्रगती वरती होत आहे अस महाविद्यालयाने सांगितले होते.

सत्रामध्ये सहभागी मुलींच्या समस्या काही प्रमाणात सारख्याच होत्या. यामुळे मुलीसोबत गट चर्चा घेतली. गट चर्चेच्या माध्यमातून ज्या समस्यांना त्या सामोरे जातात यावर चर्चा झाली. तसेच या समस्या सोडवण्यासाठी त्या काय प्रयत्न करतात याची चर्चा झाली.

समस्या सांगताना मुलीनी सांगितले की, शिक्षण बंद करण्यासाठी कुटुंबाकडून दबाव येतो, रात्री घरी अभ्यास करत बसल्यास विरोध केला जातो. पती कडून संशय घेतला जातो. कुटुंबाकडून शिक्षणासाठी आर्थिक सहकार्य मिळत नाही इत्यादी.

वरील परस्थिती ला सामोरे जात असताना मुलीनी कुटुंबाचा विरोध होणार हे काही प्रमाणात गृहीत धरायला हवे. परंतु हळू हळू कुटुंबाला शिक्षणाचे महत्व पटवून देण्याचे प्रयत्न करयला हवा. महाविद्यालयात या समस्या असणाऱ्या सर्व मुलीनी त्यांचा सपोर्ट ग्रुप तयार करायला हवा ज्या ठिकाणी तुम्ही तुमच्या समस्या आणि तणाव सांगू शकाल. पती संशय घेत असल्यास त्याला विश्वासात घेण्याचा प्रयत्न करावा. शक्य झाल्यास महाविद्यालयातील तुमच्या मित्र परिवाराची ओळख करून द्यावी जेणे करून त्याला असुरक्षित वाटणार नाही. कुटुंबातील सदस्य आणि प्राध्यापक यांची भेट करून द्यावी. अशा प्रकारे मार्गदर्शन केले.

भरत कांबळे

समुपदेशक

शिल्पा शिवणकर

समुपदेशक

दि. १६ सप्टे. २०१४ रोजी SYBCA च्या वर्गातील आरती मिरजकर या विद्यार्थिनीस मारहाण झाली. त्या संदर्भात लेखी तक्रार दिली. सदर तक्रार 'समुपदेशन समिती' ने हाताळली. त्यात प्रा. प्रतिमा परदेशी, प्रा. एस. आर. पाचारणे आणि प्रा. विनोद भोसकर यांनी काम पाहिले.

सदर प्रकरणातील दोन्ही विद्यार्थिनींना समुपदेशन करण्यात आले. मारहाण हा शारिरीक हल्ला आणि मानसिक हल्ला करण्यामागे कारणे काय होती याचा आढावा

घेण्यात आला. मारहाण करणाऱ्या विद्यार्थ्यांशी स्वतंत्रपणे संवाद करण्यात आला. संवादाच्या वेळी त्यांनी राग अनावर झाल्यामुळे, हातून हे कृत्य झाल्यामुळे मारहाण केल्याचे कबूल केले. त्यांना समज देण्यात आली.

विद्यार्थिनीशी स्वतंत्रपणे संवाद करण्यात आला. अपमानजनक वर्तन केल्याचा मनात राग असल्याचे तिने सांगितले. मुलींकडे दुय्यमत्वाने पहाणे यामुळे विद्यार्थिनी दुखावली गेली. अपमान सहन न झाल्याने तिने रितसर लेखी तक्रार केल्याचे म्हटले.

दोघांशी एकत्रित संवाद समुपदेशन समितीच्या सदस्यांनी केला. दोघांनी प्रश्नाचे मूळ लक्षात आणून दिले. मारहाण करणाऱ्या विद्यार्थ्याने [illegible] आरतीची माफी मागितली आणि प्रश्न तडीस गेला.

सदर विद्यार्थिनीने पोलीस तक्रार न करण्याचे मनोदय व्यक्त केल्याने प्रकरण महाविद्यालय पातळीवर सोडवण्यात आले.

(अध्यक्ष)